# एशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये 'एस युअर हार्ट' जनजागृती मोहीम

**पुणे** : शुभेच्छा संदेश वापरून डॉक्टरांनी तयार केलेल्या हृदयाच्या आकाराच्या सर्वांत मोठ्या संरचनेसाठी आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये स्थान मिळविले. ही नावीन्यपूर्ण रचना हृदयविकारांशी लढण्यासाठी सामूहिक वचनबद्धतेचे प्रतीक असून भारतातील पाच हजारांहून अधिक डॉक्टरांचे योगदान प्रतिबिंबित करते. जागतिक हृदय दिनानिमित्त एमक्योर फार्मास्युटिकल्सने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. हृदयविकाराच्या वाढत्या घटनांबद्दल जागरुकता निर्माण करणे, तसेच हृदय आणि रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्य सुधारण्याच्या तातडीच्या गरजेकडे लक्ष देणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. २ सप्टेंबर २०२४ रोजी ही मोहीम सुरू करण्यात आली. द लॅन्सेटमध्ये प्रकाशित झालेल्या समुदाय आधारित अभ्यासातून असे दिसले की, वेळेवर काळजी न घेतल्याने हृदय तसेच रक्तवाहिन्यांसंबंधीचे ५५ टक्के मृत्यू घरीच होतात. भारतातील सीव्हीडीच्या वाढत्या ओझ्याबद्दल लोकांमध्ये जागरुकता वाढविण्यासाठी तसेच एखादी व्यक्ती आपले संरक्षण कसे करू शकते, यासाठी हा उपक्रम विशेषतः हृदयरोगतज्ज्ञ आणि सल्लागार डॉक्टरांवर आधारित आहे.